सत्यमेव जयते

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग
महाराष्ट्र शासन

Rajiv Gandhi Science and Technology Commission
Government of Maharashtra

वार्षिक अहवाल
२०१९ - २०२०

ANNUAL REPORT
2019 - 2020



राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग

महाराष्ट्र शासन

वार्षिक अहवाल

२०१९ - २०२०

सातवा मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई- ४०० ०३२

एपीजे हाऊस, तिसरा मजला, दिनशॉ वाच्छा रोड,
के. सी. कॉलेज जवळ, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०

अनुक्रमणिका

अनुक्रमांक	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
१	प्रस्तावना	पाच
२	प्रास्ताविक	सात
३	आयोग आणि आयोगाचे कार्य	१
४	आयोगाच्या योजना	३
५	प्रकल्प विकसित तंत्रज्ञान	१०
६	राष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन	१४
७	रचना आणि वित्त व्यवस्था	१७
८	परिशिष्ट क्र १ - आयोगाने मंजूर केलेले प्रकल्प	४७
९	परिशिष्ट क्र २ - लेखा	४८



डॉ. अनिल काकोडकर
अध्यक्ष
राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग
महाराष्ट्र शासन

प्रस्तावना

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचा वार्षिक अहवाल सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रसार प्रचार आणि आधुनिक माहितीचा योग्य वापर याचा राज्याच्या विकासासाठी उपयोग करण्याच्या उद्देशाने सन २००४ च्या महाराष्ट्र विधिमंडळ अधिसूचना क्रमांक १५ अन्वये स्थापन झालेला हा आयोग निर्धारित मार्गावरून यशस्वी वाटचाल करीत आहे. उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी लोककल्याणाच्या विविध योजना आणि कार्यक्रम आयोगाने आखले आहेत

राज्यातील शैक्षणिक आणि संशोधन संस्थांमधील प्राध्यापक / संशोधक ह्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विविध शाखांमध्ये नाविन्यपूर्ण अभ्यास आणि लोकोपयोगी उपयुक्त संशोधन कार्य हाती घेण्यासाठी प्रवृत्त करणे, प्रोत्साहन देणे आणि ह्यातून नवीन संसाधने संधी निर्माण व्हाव्यात या प्रमुख उद्देशाने आयोगाचे कार्यक्रम आखलेले आहेत. अशा संशोधनातून लोकांना दैनंदिन जीवनामध्ये भेडसावणाऱ्या समस्यांचे समाधानकारक निवारण व्हावे आणि त्यांना उपलब्ध असणाऱ्या उपजीविकेच्या साधनांमध्ये, संधींमध्ये वाढ होऊन लोकांच्या जीवनमानाच्या पातळीमध्ये वाढ व्हावी अशी कल्पना आहे. सध्या सुरु असलेल्या प्रकल्पांपैकी काही मोजकी उदाहरणे म्हणजे पुण्यातील आयसर संस्थेमध्ये सुरु असलेला महाराष्ट्र जीन बँक कार्यक्रम, आयआयटी मुंबई मधील बायोमेडिकल इंजिनीरिंग अँड टेक्नॉलॉजी इन्क्युबेशन सेन्टर (BETiC) प्रकल्प, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव ह्यांच्या नियंत्रणातील सिलेज एरिया डेव्हलपमेंट प्रोग्राम (CADP) आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे सुरु असलेले सायन्स अँड टेक्नॉलॉजी रिसोर्स सेन्टर (STRC) सांगता येतील. अशा सर्व कार्यक्रम किंवा प्रकल्पांचा मुख्य उद्देश नवीन ज्ञान, डेटाबेस आणि तंत्रज्ञानाची निर्मिती, त्यांची लोकांसाठी उपयुक्तता, ग्रामीण परिसंस्थेचे मजबुतीकरण आणि उपजीविकेच्या नवीन संधी व साधनांची निर्मिती हा आहे. विद्यार्थ्यांमध्ये लोकांना उपयोगी पडेल असे संशोधन करण्याची प्रवृत्ती वाढावी याचे खूप महत्व आहे. आयोगाने यास्तव 'विद्यापीठामार्फत विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सहाय्य' असा विशेष कार्यक्रम हाती घेतला आहे. लहान शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना स्थानीय छोट्या छोट्या समस्यांना ओळखून त्यावर जवळपास उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीचा वापर करून समाधान विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. हा कार्यक्रम काही विद्यापीठांमध्ये सुरु असून इतर विद्यापीठांमध्येही सुरु करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना अनुभवी प्राध्यापकांच्या मदतीने आसपासच्या लघु आणि मध्यम उद्योगांमधील तांत्रिक अडचणींच्या निवारणार्थ उपाय विकसित करण्यासाठी छोटे प्रकल्प हाती घेण्यास प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने इंटर्नशिप योजना आहे. आर्थिक व्यवहार्यता, व्यावहारिक उपयुक्तता आणि वेगवेगळ्या शाखांतील एकत्रित काम यांना या प्रकल्पांमधे प्राधान्य दिले जाते. राज्यात विज्ञान आणि नाविन्यता केंद्रांच जाळं निर्माण करण्याची एक योजना आयोगाने हाती घेतली आहे. या केंद्रांमध्ये असणाऱ्या वैज्ञानिक कृतिप्रयोग प्रात्यक्षिक आणि अनुषंगिक कार्यक्रमांमुळे विज्ञान शिक्षण सोपे आणि मनोरंजकात्मक होते.

आयोगाच्या विविध योजनांमधून विकसित झालेले बरेचसे तंत्रज्ञान अनेक उद्योगांमध्ये वापरात आहे. इतरही तंत्रज्ञान उद्योगांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पुण्यातील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ऍग्रीकल्चर या संस्थेमध्ये यासाठी एक विशेष कक्ष सुरु करण्यात आला आहे. तरुण उद्योजकांनी प्रयोग शाळांमधे यशस्वी ठरलेले तंत्रज्ञान स्वीकारून

पुढे आणखी विकसित करावे आणि त्याचा समाजाला फायदा व्हावा यासाठी प्रयत्न सुरु आहेत. आयआयटी मुंबईमध्ये सुरु असलेल्या BETiC प्रकल्पात विकसित झालेल्या तंत्रज्ञानांनी या दिशेनी चांगली झेप घेतली आहे.

आयोगाने आतापर्यंत जैवतंत्रज्ञान, कृषी, अन्न प्रक्रिया, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, फार्मसी, आरोग्य अशा वेगवेगळ्या विषयातील एकूण १२८ प्रकल्प मंजूर करून त्यांना अर्थसहाय्य केले आहे. आतापर्यंत ६५ प्रकल्प पूर्ण झाले असून ६३ प्रकल्पांवर काम सुरु आहे. या प्रक्रियेमधून जवळ जवळ ८१ पेटंट अर्ज दाखल झाले आहेत. २००० पेक्षा जास्त संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, तंत्रज्ञ यांनी या प्रकल्पांमध्ये भाग घेतला. राज्यात सध्या आयोगाचे ४ विज्ञान आणि नाविन्यता कार्यक्रम केंद्र कार्यरत असून आणखी २ केंद्रांचे काम वेगाने सुरु आहे. आज ३५ वेगवेगळी तंत्रज्ञाने उद्योगांना वापरासाठी उपलब्ध असून १९ तंत्रज्ञाने आधीच हस्तांतरित केली गेली आहेत. त्यात १२ स्टार्ट अप्स आहेत. आतापर्यंत विद्यापीठामार्फत विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सहाय्य या योजनेमध्ये राज्यातील ७ विद्यापीठे सहभागी झाली असून त्यामध्ये जवळजवळ ८५ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. अभियांत्रिकी इंटर्नशिप कार्यक्रमात आतापर्यंत ४२० विद्यार्थी सहभागी झाले. यातून निर्माण झालेली १३ तंत्रज्ञाने उद्योगांच्या वापरात आहेत.

आयोगाच्या योजनांची व्याप्ती वाढवून विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे फायदे जास्तीत जास्त लोकसंख्येपर्यंत पोहोचवण्यासाठी आयोग प्रयत्नशील आहे. राज्याच्या हिताच्या नवनवीन योजना सुरु करण्यास शासनाने दिलेले प्रोत्साहन आणि पाठिंबा यासाठी मी शासनाचा मन:पूर्वक आभारी आहे.

हा वार्षिक अहवाल वाचकांसाठी उत्साहवर्धक आणि मौलिक ठरेल अशी मला आशा आहे.

डॉ. अनिल काकोडकर
अध्यक्ष

प्रास्ताविक

विज्ञानातील प्रगत ज्ञान आणि नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार यांचा मोठा प्रभाव विकास प्रक्रियेवर होतो. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे होणाऱ्या मूल्यवर्धनातून नवीन संधी आणि सेवा यांच्या निर्मितीस चालना मिळते. रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून लोकांना त्यांचे जीवनमान उंचावण्यास सहाय्य होते. भारताने अगदी सुरूवातीपासून विविध क्षेत्रांमध्ये संशोधन प्रयोगशाळांची विस्तृत साखळी निर्माण केली आहे. कृषी, अवकाश संशोधन, अणुशक्ती, आरोग्य, दळणवळण, रसायन यासारख्या क्षेत्रात केलेल्या पायाभूत सुविधांमुळे त्या क्षेत्रांची क्षमता वृध्दिंगत झाली आहे. निर्माण करण्यात आलेल्या या पायाभूत सुविधा सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी उपयोगात आणण्यावर राष्ट्रीय धोरणात सातत्याने भर देण्यात आला आहे. संपादन केलेल्या ज्ञानाचा वापर करून त्याचे लाभ स्थानिक पातळीवर लोकांपर्यंत पोचविण्याकरिता राज्यस्तर हा योग्य मार्ग आहे. संशोधनाच्या परिश्रमातून प्राप्त तंत्रज्ञान समाजाच्या अंतिम लाभार्थ्यांपर्यंत पोचविण्याकरिता दुवा म्हणून राज्ये उत्तम काम करू शकतात. महाराष्ट्र राज्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जा असलेल्या संशोधन संस्थांची संख्या मोठी आहे. विज्ञान व तंत्रज्ञानातून प्राप्त नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या उपयोगासाठी करण्याच्या राज्याच्या प्रयत्नांमध्ये या संस्था उत्तम योगदान देऊ शकतील.

केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या सहाय्याने बहुतांशी सर्वच राज्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान परिषदा स्थापन करण्यात आल्या आहेत. मागील चार दशकांपासून राष्ट्रीय पुढाकारातून विज्ञान व तंत्रज्ञान विषयक उपयोजनांमधून विज्ञान अधिकाधिक लोकप्रिय करण्याचे विविध कार्यक्रम, नूतनीकरण ऊर्जानिर्मिती कार्यक्रम, रिमोट सेन्सिंग, तंत्रज्ञानाचा विकास व प्रात्यक्षिके इत्यादींची राज्या राज्यांमध्ये यशस्वीपणे अंमलबजावणी होत आहे. अशा कार्यक्रमांतून विज्ञान व तंत्रज्ञानाचे मूळ रुजले असून त्यातून स्थानीय गरजेनुसार संशोधन तथा तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याचे आव्हान पेलण्याची राज्यांची तयारी झाली आहे. त्यानुसार महाराष्ट्राने सकारात्मक पुढाकार घेऊन राज्यात विज्ञान व तंत्रज्ञान परिषद स्थापन करण्याचा निर्णय घेतला व राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग या स्वायत्त संस्थेची विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोगात्मक प्रसार करण्यासाठी सन २००४ मध्ये स्थापना केली. राज्यात विज्ञान व तंत्रज्ञानविषयक राष्ट्रीय कार्यक्रमांच्या आयोजनाबरोबरच आयोगाने स्वत:च्या काही योजनांचीही आखणी केली. असे प्रकल्प आणि कार्यक्रम राज्यातील कार्यरत संशोधन संस्था आणि एजन्सी यांच्यामार्फत राबविण्यात येत आहेत, त्यातून मिळणारा प्रतिसाद आणि प्राप्त निष्कर्ष उत्साहवर्धक आहेत. ही कार्यपध्दती आणखी बळकट करून पुढील कालावधीत उपयुक्त ठरून राज्यात नाविन्यपूर्ण वातावरण तयार होईल याबाबत आयोग आशावादी आहे. विकसित तंत्रज्ञान प्रत्यक्ष वापरासाठी हस्तांतरित करणे हे एक मोठे आव्हान आहे. लोकांनी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा वापर करावा यासाठी योग्य वातावरण निर्मिती करणे गरजेचे आहे. आयोगास याची जाणीव असून त्याद्दष्टीने आयोगाची वाटचाल सुरू आहे.

प्रकल्प आधारित कार्यक्रमाअंतर्गत सध्या चार योजना आयोगाकडून राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये संशोधक, शास्त्रज्ञ, शिक्षक आणि शालेय विद्यार्थी यांना सहभागी करून घेण्यात येत आहे. त्यातून उद्योजक आणि सर्वसामान्यांना त्याचा लाभ होईल. विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नाविन्यपूर्ण कल्पनांना आयोगाकडून नेहमीच पाठिंबा देण्यात येतो. राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सहभाग, राष्ट्रीय विज्ञान व तंत्रज्ञान संशोधन संस्थांबरोबर समन्वय आणि इतर राज्यांमधील विज्ञान व तंत्रज्ञान परिषदा यांसोबत परस्परसंवाद याला आयोगात प्राधान्य आहे. विविध संस्था, संशोधक, विद्यार्थी आणि उद्योजक यांच्यापर्यंत पोहोचण्याचे आयोगाचे लक्ष्य आहे. या सर्वांनी राज्याच्या प्रगतीसाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर करावा व मोठया प्रमाणावर सहभागी व्हावे हे आयोगाचे उद्दिष्ट आहे. त्याअनुषंगाने अभिप्राय, सूचना, कल्पना व सहभाग यांचे आयोगात स्वागत आहे.

आयोग आणि आयोगाचे कार्य

महाराष्ट्र आधिनियम क्र.१५, २००४ अन्वये स्थापित झालेला राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग हा अध्यक्ष,पाच अशासकीय सदस्य, चार शासकीय सदस्य आणि सदस्य सचिव मिळून बनलेला आहे. सन २०१९-२० या कालावधीत आयोगाची रचना खालीलप्रमाणे होती.

१. डॉ. अनिल काकोडकर ..... अध्यक्ष
२. डॉ. सी. डी. मायी ..... सदस्य
३. डॉ. देवानंद शिंदे ..... सदस्य
४. डॉ. सुनील भट ..... सदस्य
५. डॉ. अभय जेरे ..... सदस्य
६. डॉ. गजानन डांगे ..... सदस्य
७. मुख्य सचिव ..... पदसिद्ध सदस्य
८. सचिव (वित्त) ..... पदसिद्ध सदस्य
९. सचिव (नियोजन) ..... पदसिद्ध सदस्य
१०. सचिव प्रभारी (विज्ञान व तंत्रज्ञान) ..... पदसिद्ध सदस्य
११. अ) डॉ. अ. वि. सप्रे (दि. ४.८.२०१९ पर्यंत) ..... सदस्य सचिव
ब) श्री. अ. श्री. मानेकर (दि. ५.८. २०१९ पासून) ..... सदस्य सचिव

आयोगाची उद्दिष्टे :

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाची सर्वसाधारण उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बदल, विकास करणे आणि प्रगती साधण्यासाठी माध्यम म्हणून काम करणे.
२. विद्यापीठे, संशोधन आणि विकास संस्था, औद्योगिक तथा अन्य संस्था यांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापराकरिता सामायिक समन्वयासाठी प्रमुख दिशादर्शक म्हणून काम करणे.
३. वापरण्यायोग्य संशोधन आणि विकासाकरिता आवश्यक सोईसुविधा उपलब्ध नाहीत अशा संस्थामध्ये त्या निर्माण करण्यास प्रोत्साहन देणे
४. क्षेत्रीय प्रात्यक्षिके, आवश्यक प्रशिक्षण व्यवस्था, प्रकाशने आणि सल्ला या माध्यमांतून सुरू होणाऱ्या प्रकल्पातून विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रसार करणे.
५. प्रयोगशाळा आणि अन्य संशोधनाच्या प्रयत्नातून प्राप्त तंत्रज्ञान त्याच्या वापरासाठी हस्तातरीत करण्यासाठी उत्प्रेरक तथा समन्वयक म्हणून काम करणे.

आयोगाची कार्ये :

तंत्रज्ञानाचा विकास आणि त्याचा उपयोग लोककल्याणासाठी होईल असे कार्यक्रम आणि प्रकल्प आयोगाकडून राबविण्यात येतात.

अस्तित्वात असलेल्या नियमावलीमध्ये आयोगाकडून गरजेनुसार आवश्यकतेनुसार सुधारणा करणे ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.

आयोगाच्या निधीचा मुख्य स्त्रोत महाराष्ट्र शासनाकडून येणारे अनुदान आहे. केंद्रशासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडूनही काही निधी प्राप्त होतो.

आयोगाच्या योजना:

या अहवालाच्या कालावधीत आयोगाने खालील मुख्य योजना राबविल्या

१. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सहाय्य
२. विज्ञान आणि नाविन्यता कार्यक्रम केंद्रांची स्थापना
३. विद्यापीठामार्फत विज्ञान तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सहाय्य
४. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी आरजीएसटीसी - टायफेक एमएसएमई इंटर्नशीप कार्यक्रम

आयोगाच्या बैठका:

सन २०१९-२० या वर्षात आयोगाच्या झालेल्या दोन बैठकांमध्ये आयोगाकडून राबविल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रम योजनांवर विस्तृत व सविस्तर चर्चा करण्यात आली आणि आयोगाकडून कार्यरत योजनांचे आणि कार्यक्रमांचे पुनर्विलोकन केले.

प्रकल्प मुल्यांकन समितीच्या (प्रोजेक्ट अप्रायझल कमिटी) दोन बैठका झाल्या त्यामध्ये एकंदर ३७ नवीन प्रकल्प प्रस्तावांवर विचार विनिमय होऊन त्यापैकी २४ प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्या प्रकल्पांना वित्तीय मान्यतेसाठी आयोगाकडे सादर करण्यात आले.

राज्यातील विविध संस्थाकडून प्राप्त झालेल्या एकूण ६६ प्राथमिक प्रकल्पांची कमिटी ऑफ पियर्सने एका बैठकीत सखोल तपासणी केली. प्रकल्प मुल्यांकन समितीच्या बैठकीमध्ये १२ प्रकल्पांचे पुनर्विलोकन करताना संबंधित प्रकल्प अन्वेषकांना प्रकल्पाच्या कामाचे सादरीकरणासाठी आमंत्रित करुन त्यांना समितीने काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या.



आयोगाच्या योजना

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सहाय्य

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वापरातून सामाजिक-आर्थिक उन्नती हा आयोगाच्या कार्यक्रमांचा दृष्टिकोन आहे. राज्यातील प्रयोगशाळा, विद्यापाठे, विज्ञान व अभियांत्रिकी संस्था अणि राज्य शासनाच्या क्षेत्रीय संस्था अशा कार्यरत संस्थांच्या माध्यमातून आयोगाचे कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्याकरिता नवनवीन प्रकल्प आणि कार्यक्रम कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक कौशल्य, क्षमता, सुविधा आणि प्रेरणा याची उपलब्धता अशा संस्थांकडे असणे आवश्यक आहे. तसेच निश्चित उद्दिष्टे आणि कालमर्यादा पाळून योजना अथवा प्रकल्प राबविला जावा असे अपेक्षित आहे.

अशा प्रकारच्या कार्यक्रमांसाठी "विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सहाय्य" ही योजना आयोगाने २००७ पासून सुरू केली आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या नाविन्यपूर्ण वापरावर आधारित प्रकल्पाकरिता प्रस्ताव मागविण्यात येतात. असे प्रकल्प प्रस्ताव महाराष्ट्रातील भौतिक संसाधने, अनुभवावर आधारित समस्या आणि विकासाच्या नवीन ज्ञानाची उपयुक्तता व वापर याच्याशी निगडित असावे असे अपेक्षित आहे. तसेच असे कार्यक्रम / प्रकल्प क्षेत्रनिहाय, समस्या निहाय अथवा विभाग निहाय असावेत. या योजनेअंतर्गत प्राप्त प्रस्तावांची तज्ञांकडून पडताळणी करुन मान्यता दिलेल्या व निवड केलेल्या प्रस्तावांना आवश्यक अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते. त्यासाठी प्रस्ताव सादर करण्यासाठी मार्गदर्शक सूचना आणि प्रपत्रे विहित करण्यात आली आहेत.

प्रकल्पाच्या थोडक्यात संकल्पनेसह प्रारूप प्रस्ताव प्रकल्प अन्वेषकांना आयोगाकडे सादर करण्यास सांगण्यात येते. असे प्रारूप प्रस्ताव आयोगास प्राप्त झाल्यानंतर तत्संबंधी गठित कमिटी ऑफ पीअर्स यांचेकडून तपासणी केली जाते. सन २०१९-२० या कालावधीसाठी खालील तज्ञांची कमिटी ऑफ पीअर्स कार्यरत होती.

१. डॉ. सी. डी. मायी ..... अध्यक्ष
   सदस्य, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग
२. प्रा. जी. डी. यादव ..... सदस्य
   कुलगुरु (सेवानिवृत्त), रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई
३. डॉ. अभय जेरे ..... सदस्य
   मुख्य शोध अधिकारी, केन्द्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली
४. डॉ. गजानन डांगे ..... सदस्य
   अध्यक्ष, योजक, पुणे
५. प्रा. ए. आर. कुलकर्णी ..... सदस्य
   (सेवानिवृत्त प्राध्यापक) जैवविज्ञान, मुंबई विद्यापीठ
६. डॉ. सतीश अग्निहोत्री ..... सदस्य
   विभाग प्रमुख, सीटीएआरए,आयआयटीबी, मुंबई
७. डॉ. अमर बॅनर्जी ..... सदस्य
   विभाग प्रमुख, टीटीसीडी, बीएआरसी, मुंबई
८. अ) डॉ. अ. वि. सप्रे (दि. ४.८.२०१९ पर्यंत) ..... सदस्य सचिव
   ब) श्री. अ. श्री. मानेकर (दि. ५.८.२०१९ पासून) ..... सदस्य सचिव

प्रारूप प्रस्तावातील कल्पना नाविन्यपूर्ण व उपयुक्त ठरेल असे कमिटी ऑफ पीयर्स यांनी अभिप्राय दिला तर संबंधित प्रकल्प अन्वेषकांना आयोगाने निश्चित केलेल्या नमुन्यांतून तपशीलवार प्रस्ताव आयोगाच्या विचारार्थ सादर करण्यास सांगण्यात येते. तपशिलवार प्रस्ताव त्यात्याविषयातील तज्ञांच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात येतात आणि त्यांचे अभिप्राय मागविण्यात येतात. तपशिलवार प्रस्ताव आयोगाच्या प्रकल्प मुल्यांकन समितीच्या विचारार्थ पाठविण्यात येतात.

सन २०१९ -२० या कालावधीतील प्रकल्प मुल्यांकन समितीची रचना खालीलप्रमाणे होती :-

१. डॉ. अनिल काकोडकर _____ अध्यक्ष
अध्यक्ष, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग
२. डॉ. सी. डी. मायी _____ सदस्य
सदस्य, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग
३. डॉ. देवानंद शिंदे _____ सदस्य
सदस्य, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग
४. डॉ. जे. बी. जोशी _____ सदस्य
सेवानिवृत्त संचालक, रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई
५. डॉ. एम. के. सप्रा _____ सदस्य
वैज्ञानिक सचिव, बीआरएनएस,डीएइ, मुंबई
६. अ) डॉ. अ. वि. सप्रे (दि. ४.८.२०१९ पर्यंत) _____ सदस्य सचिव
ब) श्री. अ. श्री. मानेकर (दि. ५.८.२०१९ पासून) _____ सदस्य सचिव

प्रकल्प मुल्यांकन समितीच्या बैठकीत विचारार्थ प्रस्तावांच्या अनुषंगाने संबंधित अन्वेषकांना प्रकल्पाबाबत सादरीकरण आणि समक्ष चर्चेकरिता पाचारण करण्यात येते. तसेच तज्ञांनी दिलेली मते विचारात घेऊन अशा तपशीलवार प्रकल्पाबाबत निर्णय घेतला जातो व त्यानंतर आयोगाच्या मान्यतेनंतर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी संबंधित संस्थेस निधी मंजूर करुन वितरित करण्यात येतो.

तसेच आयोगाने पुरस्कृत केलेल्या व सुरु असलेल्या प्रकल्पांच्या कामाच्या प्रगतीचा आढावा प्रकल्प मुल्यांकन समितीकडून घेतला जातो. वर्ष २०१९-२० या कालावधीत सुरु असलेल्या एकूण १२ प्रकल्पांच्या प्रकल्प अन्वेषकांनी केलेल्या सादरीकरण आणि त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा यातून त्यांच्या प्रगतीचा समितीने आढावा घेतला.

वर्ष २०१९-२० मधील आयोगाने मान्यता दिलेल्या प्रकल्पांची यादी परिशिष्ट क्र. १ येथे ठेवण्यात आलेली आहे. काही निवडक सुरु असलेल्या / पूर्ण झालेल्या प्रकल्पांची संक्षिप्त माहिती पुढीलप्रमाणे :-


सहाय्यित प्रकल्प (स्पष्टिकरणात्मक):

निवड करण्यात आलेले प्रकल्प हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापरावर आधारित आहेत. राज्याच्या आर्थिक, सामाजिक हितासाठी ग्रामीण भागात तंत्रज्ञानाचा प्रसार, रोजगार निर्मितीस चालना आणि एकूणच संस्थांमध्ये नवीन वातावरण निर्मिती करणे असे अपेक्षित आहे. आयोगाने सहाय्य दिलेल्या काही प्रकल्पातून आश्वासक परिणाम दिसून आले आहेत. त्यातून विकसित तंत्रज्ञान सर्वसामान्य जनतेसाठी मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरेल असे दिसून आले आहे. अशा प्रकल्पांना दिलेल्या सहाय्यातून अपेक्षित स्पर्धात्मक वातावरण निर्मिती आणि नवीन तंत्रज्ञानाभिमूख विकासास पोषक दीर्घकालीन वातावरण राज्यात निर्माण होईल.



१. अधू दृष्टी असणाऱ्यांसाठी एकाक्षी दृष्टीवर आधारित इलेक्ट्रॉनिक संचार यंत्रणेची आखणी, विकास आणि परीक्षण

आपल्या सभोवतालच्या जगाबद्दलची माहिती किंवा ज्ञान आपल्याला दृष्टीमुळे शक्य होते. डोळे आणि दृष्टी हे एक अत्यंत महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. दृष्टी अभावी सामान्य जीवन जगणे म्हणजे एक मोठे आव्हान असते. दृष्टिहीनतेमुळे मानसिक, सामाजिक, भौतिक आणि स्वतंत्र जीवनाची प्रत खूपच खालावते. सध्या अस्तित्वात असणाऱ्या इलेक्ट्रॉनिक भ्रमण/संचार मदतनीसांमधल्या त्रुटींमुळे आणि अधू दृष्टी असणाऱ्या व्यक्तींना भेडसावणाऱ्या समस्यांमुळे या प्रकल्पासाठी प्रेरणा मिळाली. या प्रकल्पामध्ये एक नवीन इलेक्ट्रॉनिक संचार मदतनीस विकसित करण्याचे उद्दिष्ट असून ते सर्वांना वापरण्यास साधे, सरळ, सोपे असावे आणि त्याद्वारे दृष्टिहीनतेमुळे येणाऱ्या अडचणींवर मात व्हावी हा या मागचा प्रमुख उद्देश आहे. पुण्यातील विश्वकर्मा इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी मध्ये यावर संशोधन करून एक विशिष्ट जॅकेट बनविले गेले ज्यामध्ये स्वतंत्र स्टिरीओ कॅमेरा आणि अल्ट्रासॉनिक लहरींवर आधारित अंतर मोजण्याची प्रणाली यांचा समावेश केला आहे. या आधुनिक प्रणालींमुळे २०० से.मी. x ४०० से.मी. एवढ्या क्षेत्रातील सर्व गोष्टींबद्दलची माहिती जसे स्थान, त्या पासूनचे अंतर जॅकेटमधील यंत्रणेला प्राप्त होते. ह्या प्राप्त माहितीच्या आधारे मुख्य प्रणाली वेगवेगळे ध्वनिलहरी संदेश, भाषा संदेश आणि कंपन संदेश निर्माण करून जॅकेटधारकाला सूचित करते. अशाप्रकारे दृष्टिहीन व्यक्तीला आपल्या चालण्याच्या मार्गातील अडथळ्यांची माहिती या विशिष्ट जॅकेटद्वारे प्राप्त होते आणि त्यांना विना अडथळा मार्गक्रमण करणे सोपे होऊ शकते.



पुलओव्हर (जॅकेट) वर बसविलेला स्टिरिओ कॅमेरा आणि अल्ट्रासोनिक रेंज फांईडर्स

२. विज्ञान आणि तंत्रज्ञान संसाधन केंद्र

आयोगाने गडचिरोलीच्या दुर्लक्षित आदिवासींसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उत्पन्नाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने गोंडवाना विद्यापीठामध्ये एक विज्ञान आणि तंत्रज्ञान संसाधन केंद्र स्थापन केले आहे. आजूबाजूच्या परिसरातील जंगलातील उत्पन्नाच्या साधनांवर आणि उत्पादनांवर आधारित सामान्य जनतेला शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात हा या मागचा प्रमुख उद्देश आहे. ह्या केंद्रात स्थानीय उत्पादनांची रेखीव आखणी, मांडणी, रचना, पद्धती ह्यांचा विकास साधून स्थानिक लोकांची कौशल्य पातळी उंचाविण्याचे आणि त्याद्वारे एकंदरीत परिसराचा विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने परिसराचा विकास घडविण्यासाठी हे केंद्र प्रयत्नबध्द आहे. हे केंद्र म्हणजे आसपासच्या समाजाच्या उत्पन्नाच्या संधी आणि शैक्षणिक ज्ञान यांचा मेळ राखण्याचा प्रयत्न आहे. या केंद्रामध्ये मत्स्यपालन, बांबूवर आधारित उत्पादनांचा कलाविकास, वनौषधी आणि इतर वनउपज यांचेशी संबंधित अनेक कार्यक्रम राबविले जातात. या केंद्राचे एक फिरते प्रात्यक्षिक वाहन असून त्याद्वारे समाजाच्या अनेक गटांमध्ये प्रात्यक्षिकं करून दाखविली जातात. हा एक यशस्वी अभिनव उपक्रम आहे. यशस्वी आणि कमी खर्चाच्या तंत्रांची प्रात्यक्षिकं जागोजागी सादर करणे, त्यांचा प्रसार करणे आणि दूर दूर विखुरलेल्या जनतेला विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित उपजीविकेच्या नवीन संधींची ओळख करून देणे हा या मागचा एक मुख्य उद्देश आहे.



बांबूपासून तयार केलेली उत्पादने





मत्स्यपालन




फिरते प्रात्यक्षिक वाहन (व्हॅन)


३. मराठवाड्यातील वनउत्पादनांवर आधारित सुक्ष्म आणि लघु उद्योगांना प्रोत्साहित करून स्थानिक वननिवासी लोकसमुदायांचे सशक्तीकरण

फळे आणि भाजीपाल्यावर प्रक्रिया करून त्यांची विक्री हा आर्थिक प्रगतीच्या उत्तम पर्यायांपैकी एक आहे. जंगलामधील फळे ही वननिवासी बांधवांना उपजीविकेसाठी उत्पन्नाच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देतात. वनांमध्ये फळे आणि भाजीपाल्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योग केंद्रांची स्थापना यामुळे स्थानिक गरीब वननिवासी लोकांसाठी रोजगार आणि उत्पन्नाच्या संधी तयार होतील. या अनुषंगाने, आयोगाने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, येथे एक प्रकल्प मंजूर केला आहे. या प्रकल्पाचा उद्देश, मराठवाड्यातील स्थानिय गरीब वननिवासी समाजातील लोकांचे फळांवर प्रक्रिया करण्यासाठी लागणारे कौशल्य विकसित करणे हा आहे. अशा प्रकारे सामान्यतः उपेक्षित फळांपासून जॅम, जेली, कँडी, गोळ्या, चॉकलेट्स, लोणची, फ्रूटबार्स, टॉफी, वाळवलेल्या फळांची उत्पादनं इत्यादी गोष्टींपासून समाजाचं उत्पन्न वाढू शकतं. या प्रकल्पांतर्गत आतापर्यंत बोरं, पेरू, उंबर, करवंद, करा या फळांवर प्रक्रिया करण्याच्या पद्धती विकसित केल्या गेल्या आहेत. यामुळे या भागात वन उत्पादनावर आधारित नवीन सुक्ष्म आणि लघु उद्योग निर्माण होण्यास आणि सामाजिक परिवर्तन होण्यास मदत होणार आहे.


बोर



उंबर



जेली


टॉफी

४. महाराष्ट्रातील वनस्पतींच्या अस्सल नमुन्यांच्या औषधी तत्वांच्या भांडाराचा विकास


विविध जातींच्या औषधी वनस्पतींच्या उपलब्धतेमध्ये महाराष्ट्र समृद्ध आहे. ह्या वनस्पतींचे वर्गीकरण, संग्रह आणि विक्रीसुद्धा होत आहे. परंतु कुठल्या झाडाच्या कुठल्या भागापासून औषधी मूलद्रव्य प्राप्त होते ह्याबद्दल पुरेशी नीट माहिती अजूनही उपलब्ध नाही. यामुळे अयोग्य आणि भेसळयुक्त औषधांचा प्रसार होण्याची भीती असते. ह्या पार्श्वभूमीवर आयोगाने पुणे येथील आघारकर संशोधन संस्थेला हा प्रकल्प मंजूर केला. ह्या प्रकल्पामध्ये महाराष्ट्रातील विविध प्रांतामधून गोळा केलेल्या वनौषधी नमुन्यांचे भांडार तयार करण्याचे उद्दिष्ट आहे तसेच हर्बेरियमची निर्मिती, वनस्पतींच्या जातींची आणि त्यांच्या विशिष्ट भागांचे औषधी गुणधर्म याबाबतचा अभ्यास आणि वेगवेगळ्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन तेथील वनौषधी आणि त्यांच्या विशिष्ट भागांच संकलन हेही अंतर्भूत आहे. आघारकर संस्थेमध्ये अशा प्रकारच्या नमुन्यांचे भांडार तयार केले गेले आहे. गोळा केलेल्या नमुन्यांचे रासायनिक परीक्षणसुद्धा या ठिकाणी केले जाते. पुण्यातील हे हर्बेरियम आंतरराष्ट्रीय ख्यातीपूर्ण हर्बेरियम्सशी जोडल्या गेले आहे. या ठिकाणी, एकूण १९२ वनौषधींच्या ७९३ नमुन्यांचा संग्रह आहे.





५. विषाणूजन्य एन्झाइम्सना प्रतिबंध करू शकतील अशा वनौषधींच्या अर्काचा विकास आणि त्यांचे मूल्यमापन

आपल्या देशामध्ये एच आय व्ही संसर्गामुळे रोगप्रतिकारक शक्ती क्षीण झालेल्या लोकांची संख्या वाढते आहे. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढविणाऱ्या आणि सुरक्षित तसेच प्रभावीपणे कार्य करू शकणाऱ्या औषधांचा शोध घेणे व विकास करणे अपरिहार्य आहे. अद्याप पर्यंत एच आय व्ही एन्झाइम्स वर परिणामकारक ठरू शकणाऱ्या मेळघाट परिसरातील औषधी वनस्पतींचा तेवढासा अभ्यास केला गेलेला नाही. या प्रश्नावर तोडगा काढण्याच्या उद्देशाने आयोगाने अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठामध्ये एक प्रकल्प हाती घेतला आहे. मेळघाट परिसरातील वनौषधींमधील जैव सक्रिय घटकांचा शोध घेणे, त्यांना वेगळे करणे आणि त्यांच्या एच आय व्ही प्रतिबंधक परिणामकारकतेचे मूल्यमापन करणे हा यामागचा उद्देश आहे. ह्या अभ्यासासाठी काही विशिष्ट प्रकारच्या वनस्पतींची निवड केली गेली आहे. ह्या वनस्पतींपासून जैव सक्रिय घटकांना वेगळे करण्यामध्ये संशोधकांना यश आले आहे आणि त्यांच्या पानांच्या अर्कामध्ये एच आय व्ही एन्झाइम्सना ८५ ते ९० टक्के प्रतिकार करू शकणारे गुणधर्म आढळून आले आहेत. ह्या प्रकल्पातून आणखी जास्त परिणामकारक निष्पन्नांची अपेक्षा आहे.




अब्रस प्रीकेटोरियस



आयलंथस एक्सेलसा




फायसेलिस मिनिमा




थेस्पीसिया लॅम्पस




थेस्पीसिया लॅम्पस



आयलंथस एक्सेलसा



फायसेलिस मिनिमा



हेलिक्टेरस आयसोरा

६. वयोवृद्ध रुग्णांसाठी बाभळीच्या शेंगांपासून प्रभावी आरोग्य-पोषक औषधी द्रव्याचा विकास


६५ वर्षांपेक्षा जास्त वय असणाऱ्या व्यक्तींसाठी योग्य प्रमाणात पोषण हा आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. प्रोटिन्स, कॅलरीज, मिनरल्स आणि व्हिटॅमिन्स यांच्या कमतरतेसह कुपोषित असणाऱ्या लोकांचे प्रमाण अंदाजे ३५ ते ५० टक्के एवढे आहे. यशस्वी आणि आरोग्यपूर्ण वृद्धापकाळासाठी सुपोषण हा खूप महत्वाचा घटक आहे. वयस्क व्यक्तींना वापरण्यास अनुकूल आणि सोयीस्कर असे पोषक उत्पादन विकसित करण्यासाठी मुंबईच्या डॉ. भानुबेन नानावटी महाविद्यालयामध्ये आयोगाने एक प्रकल्प सुरु केला आहे. यामधे ऍन्टीऑक्सिडंट्स, सुजप्रतिबंधक, रक्तदाब वाढीस प्रतिबंध करणारे आणि मधुमेह प्रतिबंधक अश्याप्रकारे बहुविध उपयोग असणारे तसेच सामान्य वृद्ध जनतेला परवडतील आणि सहज निर्माण करता येऊ शकतील अशी उत्पादनं विकसित व्हावीत हा या मागचा प्रमुख उद्देश होता. या महाविद्यालयातील संशोधकांनी वनस्पतींपासून वेगवेगळ्या रूपातील बहुगुणकारी पोषक गोळ्या निर्माण करण्यात यश मिळविले आहे.



फायटोहर्बल गोळया

७. कृषी क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या कीटकनाशक रसायनांचा नियंत्रित स्त्राव करू शकणाऱ्या सुक्ष्म कॅप्सूल्सचा विकास आणि निर्मिती


शेतांमधील रासायनिक कीटकनाशकांच्या फवारणीमुळे येणाऱ्या पिकांचे उत्पन्न वाढलेले आढळल्यामुळे कीटकनाशंकांचा वापर प्रमाणाबाहेर केला जातो आहे. परंतु यामुळे वातावरणाचे प्रदूषण आणि सजीवांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतांना दिसून येत आहे. कीटकनाशकांच्या फवारणीमुळे होणारे प्रदूषण कमी व्हावे यासाठी संशोधन करण्याच्या उद्देशाने मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी या संस्थेला या प्रकल्पाची मंजुरी दिली गेली. कीटकनाशकांचे सुक्ष्म कॅप्सूल्स विकसित करणे आणि त्यांद्वारे कीटकनाशकांचा स्त्राव नियंत्रित करणे हे एक आशादायक तंत्रज्ञान ठरू शकते. यामुळे कीटकनाशकातील सक्रिय घटकांचे स्थैर्य चांगल्या प्रमाणात होतांना आढळते. कीटकनाशकांचे सुक्ष्म कॅप्सूलमध्ये रूपांतर केल्यामुळे सक्रिय घटकांचे, उष्णता, प्रकाश, आर्द्रता आणि इतर गोष्टींमुळे होणाऱ्या ऑक्सिडेशनपासून पूर्णवेळ संरक्षण होते. यामुळे पसरणारी दुर्गंधी, अस्थिर संयुगांचे बाष्पीभवन आणि सक्रिय पदार्थांमुळे होणारी विषबाधा कमी करता येऊ शकते. या प्रकल्पामध्ये क्लोरोपायरीफॉस-फायप्रोनील आणि हेक्साकोनॅझोल-सायपरमेथ्रीन या रसायनांच्या मिश्रणांचे सुक्ष्म कॅप्सूल यशस्वीपणे तयार केल्या आहेत. प्रयोगाअंती कीटकनाशकांची परिणामकारकता सुक्ष्म कॅप्सूलमुळे जास्त काळ टिकते असे आढळून आले आहे. यामुळे पिकांच्या जीवनक्रमामध्ये कीटकनाशकांची वारंवार फवारणी करावी लागणार नाही.



मायक्रोएनकॅप्सूलेशन प्रक्रीया

८. कपाशीच्या पऱ्हाट्यांचे ओझोन प्रक्रीया करून पशुधनाकरीता रफेज खाद्य बनविण्यासाठी निर्मिती तंत्राचा विकास आणि त्याची अर्थ-तांत्रिक व्यवहार्यता पडताळणी

राज्यातील विदर्भ प्रदेशामध्ये कापूस पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. कापसाच्या रोपांच्या वाळलेल्या काड्या (पऱ्हाटी) हा एक महत्वाचा कृषि अवशेष मानला जातो. परंतु त्यातील लिग्निन या घटकाच्या उच्च प्रमाणामुळे पशु त्यांना खाऊ शकत नाहीत. या कृषि अवशेषांचा पशुखाद्य म्हणून वापर करण्यातील प्रमुख अडथळा म्हणजे लिग्निन आणि सेल्युलोज यामधील लिग्नो-सेल्ल्युलेजिक बंध (बॉण्ड). या बंधामुळे पऱ्हाटी अवास्तव कडक (टणक) होतात. यामुळे कपाशीच्या या कडक अवशेषांचा जास्तीत जास्त वापर केवळ ज्वलनासाठी ब्रिकेट्स तयार करण्या पुरताच मर्यादित राहिला आहे. या कठीण अवशेषांना पाचनयोग्य मृदू बनवून, त्यांच्या छोट्या छोट्या काड्या तयार करून त्यांचा पूरक रफेज खाद्य म्हणून गायी आणि बकऱ्यांसाठी उपयोग करता यावा यासाठी आय आय टी मुंबई, भारतीय ऍग्रो इंडस्ट्रीज फाऊंडेशन (बाएफ) उरळीकांचन, पुणे आणि नागपूर व्हिटेरिनरी कॉलेज, नागपूर हे संयुक्तपणे काम करीत आहेत. पशुधनासाठी अधिक खाद्य उपलब्ध व्हावे हा देखिल या प्रकल्पाचा उद्देश आहे. या संस्थांनी, एकत्रितपणे संशोधन करून कपाशीच्या या अवशेषांवर ओझोनेशन प्रक्रिया आणि नंतर त्यांचे पाचनयोग्य खाद्य-कांड्यामध्ये रूपांतर करण्याची प्रक्रिया विकसित करण्यात यश मिळविले आहे.



उत्पादन प्रक्रीया



पुर्णान्न पेलेट

९. अझोला वनस्पतीची लागवड आणि पूरक तसेच पोषक खाद्य म्हणून अझोला वनस्पतीच्या वापराचा प्रसार

दुग्ध आणि कुक्कुटपालन या व्यवसायातील पशु आणि पक्षी (गाई, म्हशी, बकऱ्या, कोंबड्या) यांच्यासाठी अझोला या फर्न प्रकारच्या वनस्पतीचे संभाव्य पूरक आणि पोषक खाद्य म्हणून खूप महत्व आहे. यामधे आवश्यक असे अमिनो ऍसिडस्, लोह, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, पोटॅशिअम यासारखी खनिजे आणि भरपूर प्रमाणात जीवनसत्व अ आणि जीवनसत्व बी-१२ आहेत असे आढळून आले आहे. पावसावर अवलंबित क्षेत्रातील पशुधनासाठी दुष्काळी काळामध्ये अपारंपरिक प्रथिने पुरवणी खाद्य म्हणून अझोलाचा वापर करता येऊ शकतो. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज हलवता येऊ शकेल अशा प्रकारचे प्लास्टिक बेड आणि कमी पाण्याचा वापर करून थोडयाशा जागेत अझोला वनस्पतीची लागवड करता येते. अझोला पिकाची उपयोगिता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना आणि उद्योजकांना या वनस्पती खाद्याचे पोषक परिणाम आणि लागवडीच्या पद्धतीची माहिती प्रत्यक्ष कृतीतून दाखविण्यासाठी, आयोगाने बाएफ या संस्थेला अर्थसहाय्य करून हा प्रकल्प मंजूर केला आहे. या प्रकल्पातून तयार केलेली अझोलाची रोपं शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात लागवड करण्यासाठी दिली जातात. तीन महिन्यांच्या निरीक्षणानंतर अझोला खाद्यामुळे बकऱ्यांच्या वजनात चांगली वाढ झालेली आढळून आली आहे. या प्रयोगामुळे अहमदनगर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी अझोलाच्या लागवडीसाठी उत्साहवर्धक प्रतिसाद दर्शविला आहे.



अझोला



बकऱ्यांसाठी खाद्य - अझोला

१०. संधिवातामुळे येणारी सूज आणि वेदना शमविण्यासाठी पश्चिम भारतात आढळणाऱ्या औषधी वनस्पतींवर आधारित नॅनो-इमूलजेलचा विकास

संधिवातामुळे होणाऱ्या वेदना शमविण्यासाठी उपचारात्मक ठरेल अशा प्रभावी आणि सुरक्षितरित्या कार्य करणाऱ्या वनस्पतीय औषधांची उणीव सतत भासते आहे. या पार्श्वभूमीवर, आयोगाने मुंबईच्या डॉ. भानुबेन नानावटी फार्मसी कॉलेजला मंजूर केलेल्या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश गुग्गुळ, आलं, एरंड आणि मेथी ह्या वनौषधींचे अर्क/तेल वापरून नॅनो इमल्शन तंत्रावर आधारित उपचार प्रणाली तयार करणे हा आहे. यामुळे संधिवातामुळे येणारी सूज आणि त्यामुळे होणाऱ्या वेदना ह्यावर परिणामकारक उपचार होऊ शकतील. अशाप्रकारचे संशोधन कार्य सध्या सुरु असून एक अनोखे वनस्पतीय औषधी मलम तयार करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. संधिवाताची समस्या असणाऱ्या रुग्णांना हे एक वरदान ठरू शकेल. एरंड आणि मेथी ह्यांची तेलं आणि गुग्गुळ, आलं ह्यांचे अर्क यांच्या औषधी गुणधर्मामुळे तयार होणाऱ्या मलमामध्ये सुजेला प्रतिबंध करण्याची विशेष क्षमता येऊ शकते. या संशोधनातून तयार होणाऱ्या औषधी मलमामुळे (नॅनो इमूलजेल) त्वचेला इजा न होता सुजेला प्रतिबंध करणारी उपचार पद्धती विकसित होऊन तिचा जनतेला दीर्घ काळ फायदा होऊ शकेल.



नॅनोइमूलजेल

प्रकल्प विकसित तंत्रज्ञान

प्रकल्पांमधून विकसित करण्यात आलेली तंत्रज्ञाने उपयोगात आणण्यासाठी तसेच इच्छुक वापरकर्त्यांपर्यंत त्याचा लाभ पोहचावा यासाठी आयोगाकडून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. काही प्रकल्पांमधून उपलब्ध झालेली तंत्रज्ञाने इच्छुक उद्योजकांना व्यापक तत्वावर (Non Exclusive basis) हस्तांतरीत करण्यात आली आहेत. बँकांच्या वित्तीय सहाय्याने स्थापन्यात आलेले उद्योग व्यापारी तत्वावर कार्यरत असून प्राप्त आकडेवारीवरून त्यांची उपयुक्तता सिध्द झालेली आहे. ही तंत्रज्ञाने इतरांनाही उद्योग स्थापन करण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील स्थानिक कच्च्या मालाच्या मूल्यवर्धनातून उत्पन्नवाढीसाठीही उपलब्ध् असतील.

आतापर्यंत १९ तंत्रज्ञाने उपयोगात आणली गेली आहेत. अन्य तंत्रज्ञाने निश्चित झाली असून पुढील काळात औद्योगिक वापरासाठी उपलब्ध होतील.

अ.क्र.	उपलब्ध तंत्रज्ञान	
१	सोलार प्लांट फॉर ड्राईंग फ्रुट्स व्हेजीटेबल्स ॲन्ड फिश	
२	जस्टसीप : न्युट्रीशीअस डीहायड्रेटेड व्हेजीटेबल्स ड्रींक	
३	फ्लोराईड फ्री ड्रींकींग वॉटर : हाऊसहोल्ड केमो-डीफ्लोरीडेशन युनिट	
४	अरसेनिक फ्री ड्रींकींग वॉटर : हाऊसहोल्ड केमो-डीआरसेनिफीकेशन युनिट	
५	मिल्क चिलींग प्लांट विथ एक्झरजी ऑपटीमाइज्ड हिट बेस रेफ्रिजेरेशन	
६	ऑरथोपेडिक सर्जरी प्लॅनर	बायोमेडिकल इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी इंक्युबेशन सेंटर
७	स्मार्ट स्टेथोस्कोप मॉडयूल	
८	हायब्रीड प्लास्टर स्प्लींट	
९	स्कीन स्प्रे गन	
१०	टेंपोरल बोन फॅनटोम	
११	डीआयसीयूएम एएम (लूसीड इमप्लांटस)	
१२	डायबेटीक फुट स्क्रीनर	
१३	इंडोट्रॅकील ब्लॉकेज डीटेक्टर	
१४	नी अँकल फूट ऑर्थोसिस	
१५	ग्लोकोमा स्क्रीनिंग	
१६	सर्जिकल गाइड्स	
१७	जॉ सेंट्रीक रिलेशन	
१८	वाइड स्पेक्ट्रम मायक्रोबीयल पेस्टीसाईड युजफुल इन सिंगल क्रॉप सिस्टम	
१९	इक्सॉटीक फ्रुट (मँगो, जामुन, जॅकफ्रुट आणि स्ट्रॉबेरी) वाईन प्रोडक्शन	

तंत्रज्ञाने वापरासाठी हस्तांतरित करण्याच्या प्रक्रीयेसाठी आयोगाने मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ऍग्रिकल्चर, पुणे (MCCIA) येथे तंत्रज्ञान हस्तांतरण कक्ष स्थापन केला आहे. त्यांच्या मार्फत आयोगाकडून विकसित तंत्रज्ञानाच्या वापरासाठी इच्छुक उद्योजकांचा शोध घेण्यात येतो. त्याचप्रमाणे राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या प्रकल्पातून विकसित तंत्रज्ञानाचा वापर व उपयोग करण्यासाठी टाटा ट्रस्ट अंतर्गत फाऊंडेशन फॉर इनोव्हेशन ॲन्ड सोशल एन्टरप्रन्युअरशिप (FISE) राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगा सोबत सहकार्य करीत आहेत.

विज्ञान आणि नाविन्यता कार्यक्रम केंद्रांची स्थापना

विज्ञान व तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर शिक्षणाअंतर्गत विद्यार्थ्यांना सामावून घेण्याच्या उद्देशाने राज्यात "विज्ञान आणि नाविन्यता कार्यक्रम केंद्रांची स्थापना" ही योजना आयोगाने कार्यान्वित केली आहे. विज्ञान शाखेमध्ये वैज्ञानिक वातावरण वृध्दिंगत व्हावे अणि उद्योजकत्वाचे कौशल्य बळकट व्हावे या दृष्टिकोनातून शैक्षणिक संस्थांमध्ये अशी केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद (NCSM) या केंद्र शासनाच्या संस्थेच्या सहयोगाने ही योजना राबविण्यात येत आहे. आतापर्यंत चार केंद्रे राज्यात कार्यान्वित करण्यात आली असून आणखी दोन निर्माणाधीन आहेत. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात खालील ठिकाणी केंद्र कार्यरत आहेत.

१. वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणानगर, तालुका-पन्हाळा, जिल्हा-कोल्हापूर.




२. प्रवरा मुलींची इंग्रजी माध्यमाची शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय, लोणी, तालुका-राहता, जिल्हा-अहमदनगर.





३. रयत शिक्षण संस्था, सातारा.




४. श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती.





निर्माणाधीन केंद्र

१. शारदाबाई पवार विद्यानिकेतन, बारामती, जि.पुणे

२. देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख, जि.रत्नागिरी

प्रत्येक केंद्रासाठी खर्च रु.२.५० कोटी असून ७५ % आयोग आणि २५ % संस्था उचलणार आहे. संस्थेने त्या व्यतिरिक्त केंद्रासाठी एक हेक्टर जमीन आणि केंद्र कार्यान्वित करून कार्यरत ठेवायचे आहे. केंद्र कार्यान्वित झाल्यानंतर त्या प्रदेशातील सर्व विद्यार्थ्यांबरोबर इतर शाळेतील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असेल. त्या अनुषंगाने आयोगाने संस्थेबरोबर सामंजस्य करार केलेला आहे.

अशा प्रकारची आणखी काही केंद्रे सुरू करण्याचा आयोगाचा मानस आहे. अर्थात त्यासाठी निधीची उपलब्धता, सुयोग्य सहभागी होणारी संस्था आणि अंमलबजावणी करणारी संस्था या बाबींवर अवलंबून असेल.

विद्यापीठांमार्फत विज्ञान व तंत्रज्ञान वापरासाठी सहाय्य

विद्यापीठाचे विभाग आणि संलग्न असलेल्या महाविद्यालयांमधील संशोधकांसाठी आयोगाने "विद्यापीठांमार्फत विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सहाय्य" ही योजना सुरू केली आहे. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट, विज्ञान आणि अभियांत्रिकी महाविद्यालय, वैद्यकीय संस्था आणि तंत्रनिकेतने यामध्ये स्थानिक संदर्भाशी निगडित प्रकल्पांच्या उपक्रमाचे विकेंद्रीकरण करणे, तसेच विज्ञान व तंत्रज्ञानाच्या मूळ गाभ्यावर आधारित नाविन्यपूर्ण व विकसित अशा तंत्रज्ञानास उत्तेजन देणे हे आहे. स्थानिक विकासाच्या गरजा आणि लघु कालावधीचे प्रकल्प विज्ञान व अभियांत्रिकी महाविद्यालये तसेच तंत्रनिकेतनच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत.

सन २०१९- २० या वर्षात खालील सात विद्यापाठांमध्ये ही योजना राबविण्यात आली आहे.

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

२. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

३. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

४. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

६. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

७. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

या योजनेतून विद्यापीठांच्या कक्षेतील त्या विभागातील लहान संस्थांमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यास प्रेरित करणे तसेच त्यांच्यामध्ये संशोधनाची आवड निर्माण करण्यात योजना यशस्वी झाली आहे. आतापर्यंत ८५ प्रकल्पांतून विद्यापीठांशी संलग्न संस्थांना सहाय्य करण्यात आले आहे. सन २०२०-२१ या वर्षात आणखी अन्य विद्यापीठातून या योजनेची व्याप्ती वाढवण्याचे प्रस्तावित आहे.


आरजीएसटीसी-टायफेक एमएसएमई इंटर्नशीप अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम

अभियांत्रिकी ज्ञान उद्योगाच्या वापरासाठी उपयोगात आणण्यासाठी केंद्र शासनाच्या टेक्नॉलॉजी इन्फोर्मेशन फॉरकास्टिंग अँड असेसमेंट कौन्सिल (TIFAC) विज्ञान व तंत्रज्ञान विभाग यांच्या सहकार्याने आरजीएसटीसी - टायफेक एमएसएमई इंटर्नशिप कार्यक्रम अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी आयोगाने सुरू केला आहे. औद्योगिक क्षेत्राच्या गरजांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वापरातून औद्योगिक ज्ञानाचे आदानप्रदान होऊन नाविन्यपूर्ण आणि फलदायी ठरणाऱ्या उपक्रमास चालना मिळेल असा या योजनेचा दृष्टिकोण आहे.

सध्या आयोगाने ही योजना प्रायोगिक तत्त्वावर महाराष्ट्रात सुरू केली आहे आणि औद्योगिक समुहासोबत दोन अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यान्वित आहे.

१. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली
२. रामदेवबाबा अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालय, नागपूर

प्रकल्पाची निवड करणे आणि प्रत्यक्ष राबविणे अशा दोन स्तरावरून योजना राबविण्यात येत आहे. इच्छुक उद्योगांमध्ये योजना राबविणे आणि प्रकल्पाची निवड करण्यासाठी संस्थेकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची व्यवस्था करण्यात येते. वरील दोन संस्थांमध्ये सन २०१९-२० या वर्षात हा कार्यक्रम राबविण्यात आला असून त्यास विद्यार्थ्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. सुमारे ६८ विद्यार्थ्यांनी या योजनेत सहभागी होऊन त्याचा लाभ घेतला आहे. आतापर्यंत सुमारे ४२० विद्यार्थ्यांना लाभ होऊन १० पेटंट दाखल झाले आहेत आणि सुमारे १३ प्रकल्प औद्योगिक संस्थांनी स्वीकारले आहेत.



राष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन

अंशिक स्वरूपात मिळणाऱ्या अनुदानातून आयोगाकडून राष्ट्रीय कार्यक्रमांचे महाराष्ट्रात आयोजन करण्यात येते. प्रस्तुत उपक्रमांची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे :

१. राष्ट्रीय विज्ञान दिवस

